# लाटांचे स्वागत

*ईशा सरदेसाई यांच्याद्वारे पुनर्लिखित*

लहर पाण्याकाठी बसून किनाऱ्यावर विखुरणाऱ्या पाण्याच्या लाटांना न्याहाळत होती. किनाऱ्यावरील वाळूपाशी पोहोचेपर्यंत त्या लाटा इतक्या लहान होऊन जात की, तेथील पृष्ठभागावर कोणतीही खूण त्या उमटवू शकत नसत. तिथे दूरवर विस्तीर्ण नीलसागरात मात्र त्याच लाटा अतिशय विशालकाय आणि शक्तिशाली होत्या. लहरने आपले डोळे मिटले आणि दूरवरून येणाऱ्या त्या मोठ्या लाटांचे कल्पनाचित्र ती रंगवू लागली — पाण्याच्या मंथनातून या लाटा कशा प्रकारे उद्‌भवत असतील आणि कशा प्रकारे उचंबळत त्या आकाशाला स्पर्श करत असतील याचे.

लहरने एक प्रदीर्घ श्वास घेतला. स्वतःच्या कलेत अतिशय कुशल आणि निपुण असलेली अशी ती एक नृत्यांगना होती. ती जेव्हा एकटी असे अथवा जेव्हा ती फक्त तिच्या शिक्षिकेसह असे, तेव्हा तिला असे वाटे की, जणू तिच्या कौशल्याला खरोखर कोणती सीमाच नाही. ती संपूर्ण खोलीभर गिरक्या घेत असे आणि तिच्या अंतरात जे काही सुर-ताल वाजत असत त्यांच्यामध्ये ती पूर्णपणे निमग्न होत असे. सातत्याने बदलत राहणाऱ्या तिच्या मुद्रांमध्ये एक संतुलन असे — तीव्रतेचे आणि सौम्यतेचे, नैसर्गिक जोमाचे आणि उत्कृष्ट डौलदारपणाचे.

परंतु ती जेव्हा दहा-वीस लोकांच्यासमोर — किंवा ज्याच्या केवळ विचारानेही ती घाबरून जात असे — *शेकडो* लोकांसमोर रंगमंचावर जात असे, तेव्हा मात्र काहीतरी बदलून जात असे. अचानकपणे तिचे लक्ष त्या लोकांकडे जात असे, ज्यांच्या नजरा फक्त तिच्यावरच खिळलेल्या असत. मग ती कल्पनाचित्र रंगवू लागे की, लोक तिच्याविषयी काय विचार करत असतील; ती मनातल्या मनात कथा रंगवू लागे की, इतक्या विशाल आणि गुहेसारख्या रंगमंचावर तिला असे एकटीला उभी असलेली पाहून लोकांना तिच्याबद्दल काय वाटत असेल. जेव्हा ते बारकाईने तिच्याकडे पाहत, तेव्हा तिला असे वाटे की, जणू तिच्या शरीरावर एक मोठे ओझे लादले गेले आहे आणि तिचे खांदे, हात आणि पाय त्या ओझ्याखाली दाबले जात आहेत. आणि मग नृत्य करण्याकरता ती जेव्हा तेच पाय उचलत असे, तेव्हा ज्या मुद्रांचा तिने पूर्वाभ्यास केलेला असे त्यातील एकही मुद्रा योग्य रीतीने होत नसे. ते लय-ताल, जे एकेकाळी

वातावरणातील कणाकणांत तिच्यासमवेत असत, आता ते अचानकच तिला जमूच शकत नसत. लुप्त होऊन जात — अद्भुतरीत्या गायब होत असत.

समुद्राच्या लाटा किनाऱ्यावर आदळत होत्या. जगातील या एकांत स्थानी, तटवर्तीय प्रदेशात जिथे ती राहात होती, तेथील वाळू गुलाबी छटा असलेली होती; कितीतरी शंख-शिंपले आणि खनिज पदार्थांच्या रूपात प्रवाळांचे अवशेष तिथे विखुरले गेले होते.

तेवढ्यात, तिच्या मागून कोठून तरी एक आवाज आला.

“लहर? ती तूच आहेस ना?”

लहरने मागे वळून पाहताच तिला दिसून आले की, तिची शिक्षिका तिच्याकडे येत होती. ती शिक्षिका असामान्य लालित्य आणि प्रतिष्ठा लाभलेली स्त्री होती, तिचे चालणे-बोलणे प्रभावशाली आणि शाही थाटाचे होते, तिचे पदलालित्य वाहत्या जलाप्रमाणे तरल व सहज होते.

“तुझ्या मनात काय चालले आहे?” शिक्षिकेने लहरच्या जवळ येत तिला विचारले.

लहरने उसासा टाकला.

“मला ते जमणार नाही,” ती म्हणाली. “मी लोकांसमोर नृत्य करू शकत नाही. मला तर असे वाटू लागले आहे की, मला ते कधीच शक्य होणार नाही.”

“तू तसा विचार का करते आहेस?” शिक्षिकेने विचारले.

“कारण पुन्हापुन्हा, अनेकदा तसेच तर घडत आले आहे,” लहर म्हणाली. “ज्या-ज्या वेळी मी नृत्य करण्यासाठी रंगमंचावर जाते, त्या-त्या वेळी मी अडखळते. मी नृत्यातील मुद्रा आणि माझे पदन्यास विसरते.”

तिची शिक्षिका पाण्याकडे टक लावून पाहू लागली.

“तू जे विसरतेस ते हेच आहे का?” तिने शांतपणे विचारले. “तुझ्या मुद्रा आणि तुझे पदन्यास?”

शिक्षिकेने पुन्हा लहरकडे पाहिले. तिला दिसून आले की, लहर गोंधळून गेली आहे. शिक्षिका म्हणाली, “काय चुकले आहे याचा विचार न करता, तू कदाचित तुझे लक्ष दुसरीकडे कुठेतरी वळवू शकतेस.”

“दुसरीकडे कुठेतरी?” लहरने पुनरुच्चार केला. “पण — कुठे? माझ्या मनात तर फक्त हाच विचार येत राहतो की, रंगमंचावर गेले की, मी किती अस्वस्थ होते.”

“तुझे नाव लहर आहे,” शिक्षिका म्हणाली. “त्याचा अर्थ काय आहे?”

“त्याचा अर्थ आहे . . . *समुद्राची लाट,* ” लहरने उत्तर दिले. “जशी महासागराची महान लाट.”

“होय,” शिक्षिका म्हणाली. “हो. महान लाटा. तू त्यांच्याबद्दल विचार करण्याचा प्रयत्न का करत नाहीस?” तिने लहरचा खांदा हलकेच दाबला आणि ती निघून गेली.

शिक्षिका नुकतेच जे म्हणाली त्यावर लहर विचार करू लागली.

*माझे नाव,* तिने विचार केला. *लाटा. महान लाटा.*

तिने आपले डोळे बंद केले आणि ती आपल्या श्वासोच्छ्वासाच्या सुपरिचित अशा दिलासा देणाऱ्या प्रवाहामध्ये विसावली. लाटांचे वर उचंबळणे आणि सौम्यतेने विखुरणे यांच्याबरोबर तिच्या श्वासाचा प्रवाह कसा लयबद्ध होत होता याची जाणीव तिला झाली. *मी लाटा आहे,* तिने विचार केला. *महान लाटा.*

लहर स्वतःशीच संवाद साधू लागली, तिने या शब्दांचा पुनरुच्चार करण्यास सुरुवात केली. *मी लाटा आहे, मीच आहे लाटा, मी महान लाटा आहे.* अधुनमधून तिचे मन भरकटू लागे आणि तिच्या मानसपटलावर पुन्हा रंगमंच प्रकट होत होई. किंवा सर्व लोकांचे डोळे आपल्यावरच खिळले आहेत या भावनेचे तिला स्मरण होई आणि तिच्या त्वचेला झिणझिण्या येण्यास सुरुवात होई, तिला कळतच नव्हते की, काय घडते आहे, जणू कोणीतरी तिला सांगते आहे — की *ती* — सुरक्षित नाही. आणि अशा क्षणांमध्ये ती पुन्हा आपल्या श्वासोच्छ्वासावर आपले लक्ष वळवत होती. ती नावावर, आपल्या नावावर परत येत होती.

*मी लाटा आहे. मी महान लाटा आहे.*

कालांतराने तिला प्रत्येक गोष्टीत फक्त लाटाच दिसू लागल्या, मग डोळे उघडे असोत वा बंद. त्या प्रथम छोट्या तरंगाच्या रूपात असत आणि नंतर महान लाटा बनत. त्या लाटा विशालकाय होत्या, हवेत वेगाने उचंबळत होत्या व चंचलतेने गिरक्या घेत होत्या. प्रत्येक वेळी जेव्हा पाणी स्वतःमधूनच वर उसळे, प्रत्येक वेळी जेव्हा ते किनाऱ्याच्या दिशेने कोलांटी घेत असे, तेव्हा ते आनंदित होत असे.

लहरच्या मनातील पोवळ्याच्या रंगाच्या वाळूवर पाणी हेलकावत तोपर्यंत पुढेपुढे येत राहिले, जोपर्यंत त्या महान लाटा तिच्या दिशेने पुढे सरसावत नाही. त्यांच्यापासून स्वतःला वाचवणे कठीण होते. त्या पुढे सरसावल्या — आशीर्वाद आणि प्रचंडतेसह, त्या तिचे अस्तित्व शुद्ध करत होत्या, त्या तिच्या अंतःकरणाला दिलासा देत होत्या, जन्मजन्मांतरीपासून तेथील ती धूळ धुवून टाकत होत्या, जी प्राक्तनाच्या एखाद्या फेऱ्यामुळे असो किंवा व्यक्तित्वाच्या मजबूत पकडीमुळे असो, तिथे साचली होती.

ते महान प्रेमदेखील तिच्या दिशेने सरसावले — आणि अगदी प्रथमच, तिने त्याला येऊ दिले. एका पाठोपाठ एक, तिच्या दिशेने पुढे येणाऱ्या या प्रेमाच्या लाटांची शिखरे सूर्यप्रकाशाने झगमगत होती आणि सागरात खोलवर प्रकाश पसरवत होती. एखाद्या अंगाईगीताप्रमाणे त्या लाटा, तिच्या श्वासोच्छ्वासाच्या गतीबरोबर हेलकावे खात होत्या. तिचे मन निश्चल आणि शांत होते. तिचे हृदय — तिला त्याची जाणीव होत होती! एक महान आणि उज्ज्वल हृदय तिच्या उरामध्ये झगमगत होते, हृदयाच्या प्रत्येक ठोक्याबरोबर तिच्या अस्तित्वातून उत्साहाचा आणि जोशाचा झरा प्रवाहित होत होता. आत्तापर्यंत याकडे तिचे लक्ष का गेले नव्हते?

आणि अवकाशापलीकडील या अवकाशामध्ये, समयापलीकडील या समयी, तिला काहीच सिद्ध करण्याची गरज नव्हती. तिला काहीच बनण्याची गरज नव्हती. तिला याक्षणी ती जगत असलेल्या तिच्या स्वतःच्या कथेखेरीज, दुसऱ्या कोणत्याच कथेची गरज नव्हती — ती कथा, जिचा अनुभव यावेळी ती घेत होती. केवळ ती होती आणि अंतहीन सागर होता, आणि ती *स्वतः*च तर होती हा अंतहीन सागर. तीच तो होती, ती 'ते' होती, ती तरल सूर्य होती.

लहरने आपले डोळे उघडले. ती आपल्या जागेवरून उठली, तिचे शरीर तिच्यासमोर तरंगत होते, तरीदेखील ते पूर्णपणे तिच्या स्वामित्वाखाली होते. वेळ जवळपास होत आली होती.

ती त्वरेने नृत्याच्या हॉलकडे चालत गेली आणि तिथे पोहोचल्यावर थेट रंगमंचावर. लोक — तिचे प्रेक्षक — तिथे जमा झाले होते, कारण त्यांनाही माहीत होते की, वेळ झाली आहे.

लहरने जेव्हा रंगमंचाकडे पाहिले, तेव्हा तिला जे दिसले, तो होता फक्त प्रकाश. प्रकाश वरून चमकत होता, खालून वर प्रकाशशलाका झळकत होत्या, चहुबाजूंना प्रकाशच प्रकाश होता. लहरने आपले केस बांधले आणि मग पैंजण पायात सरकवले. तिने एक दीर्घ श्वास घेतला आणि मग — विचलित न होता, न थांबता, महत्प्रयत्नाने प्राप्त झालेल्या या समजूतीसह की, आपल्या अस्तित्वाची निर्मिती कशासाठी

झाली आहे आणि आपल्यासाठी काय निर्माण झाले आहे — ती प्रकाशात उतरली. असे वाटत होते की, कुठुनतरी, कदाचित स्वर्गातून संगीतकारांनी संगीत वाजवण्यास सुरुवात केली असावी.

लहरचे हात आपसूकच वरच्या बाजूला उचलले गेले. तिच्या हाताचे तळवे, एका मुद्रेची रचना करत उघडले, बंद झाले आणि पुन्हा उघडले. तिची पावले जमिनीवर एका बाजूपासून दुसऱ्या बाजूपर्यंत तरंगू लागली. पाण्याच्या त्या आवाजाला अजूनही कानांमध्ये धारण करीत, अंतरामध्ये उचंबळणाऱ्या प्रेमाच्या लाटांना घेऊन, ती नृत्य करू  लागली.

© २०१९ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

ही कथा झेन बुद्ध परंपरेच्या एका क्लासिक कोआनने प्रेरित आहे.